| CBSE X<br><br>Date : | **MT EDUCARE LTD.**<br>SUBJECT : MARATHI<br>**SEMI PRELIM - II**<br>**MODEL ANSWER PAPER** | Marks : 80<br><br>Time : 3 hrs. |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | **खण्ड : 'क'** | |
| **A.1.** | | |
| १. | पाहुणा | **1** |
| २. | सर्वसामान्यपणे व्यक्तीच्या जीवनावर आई किंवा वडिलांचा प्रभाव पडतो. | **1** |
| ३. | जन्मपूर्व अवस्थेपासून माणसाला पाय फुटेपर्यंत तो आईच्या पुढ्यात असतो. त्या वयात आधाराशिवाय जगता येत नाही त्या वयात आई हाच एकमेव आधार असतो. त्यामुळेच त्या बाळाचे जीवन ही 'आई' या वृक्षाची पारंबी असते. | **2** |
| ४. | आई कधी नोकरी करणारी असते तर कधी नोकरी करणारी नसते. त्यामुळेच तिचे कधी वेगळे उत्पन्न असते तर कधी नसते. आपल्या वेगळेपणाचा त्याग करून मोकळेपणाने घरासाठी ती सर्वस्व अर्पण करत असते. तिच्याकडे कोणाचे लक्ष नसले तरी ती सर्वांकडे लक्ष देते. सर्वांचे भरणपोषण करते म्हणून आईला 'गृहदेवता' म्हटले आहे. | **3** |
| **A.2.** | | |
| १. | नानासाहेब पेशव्यांनी आंग्रे यांचे आरमार इंग्रजांच्या मदतीने बुडविले. | **1** |
| २. | यापूर्वी दापोली येथे शिवाजी महाराजांनी मोठ्या प्रयत्नाने आरमार उभारले होते. | **1** |
| ३. | दापोली गाव मोठे सुंदर आहे. ते समुद्रापासून चार कोसावर असून तेथील हवा फार आरोग्यदायक आहे. तसेच इंग्रजांच्या फलटणी येथे असल्यामुळे कॅम्प व पुढे याचाच काप असा अपभ्रंश होऊन त्यास 'कापदापोली' म्हणतात. | **2** |
| ४. | शिवाजी महाराजांच्या राजनितीत 'ज्याचा दर्या त्याचे वैभव' हे सूत्र सांगितलेले आहे. | **1** |
| ५. | दापोलीपासून समुद्र चार कोस दूर आहे. | **1** |
| | **खण्ड : 'ख'** | |
| **A.3.** | **खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा.** | |
| १. | **विज्ञानाचे महत्त्व**<br>''विज्ञानाची ही ज्ञानगंगा, आली तुमच्या घरी<br>दिशा मिळाली प्रगतीची, चौघडे वाजवा दारी.''<br>सर्व प्राणिमात्रांत मनुष्यप्राणी हा बुद्धिमान समजला जातो. मानवाने बुद्धीच्या साहाय्याने विज्ञानात प्रगती केली, स्वतःची प्रगती केली. असाध्य अशा गोष्टी साध्य केल्या. दगडावर दगड घासून अग्नी निर्माण करण्यापासून ते संगणकापर्यंतचा मानवाचा प्रगतीचा प्रवास सुरू आहे. तो तसाच सुरू राहणार | **8** |

आहे. या विज्ञानातील प्रगतीमुळेच आज आपण पृथ्वीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत काही तासात जाऊ शकतो. दुसऱ्या देशातील खेळ, बातम्या दूरदर्शनच्या माध्यमातून पाहू शकतो. परदेशात राहणाऱ्या नातेवाईकांशी इंटरनेटच्या सहाय्याने संवाद साधू शकतो. संगणकाच्या मदतीने अनेक कठीण कामे चुटकीसरशी करू शकतो. आज या संगणकाचा वापर सर्व क्षेत्रात आपण करतो. चंद्रावर वस्ती करण्याचे स्वप्नही आता आपले प्रत्यक्षात उतरणार आहे ते या विज्ञानामुळेच.

वैद्यकीय क्षेत्रातसुद्धा विज्ञानामुळे प्रगती झाली आहे. अवघड अशा अवयवरोपणाच्या शस्त्रक्रिया, अवयवरोपण विज्ञानामुळे शक्य झाल्या आहेत. नेत्रदानामुळे आपण एखाद्या माणसाच्या जीवनात प्रकाश निर्माण करू शकतो. रक्तदान, देहदानामुळे अनेकांचे प्राण वाचवू शकतो. हृदय, मूत्रपिंड खराब झाल्यास ते बदलू शकतो. मूल न होणाऱ्या जोडप्यास 'टेस्ट ट्युब बेबी' द्वारे आनंद मिळू शकतो. असाध्य अशा रोगांवर आज आपण मात केली आहे, हे सर्व कशामुळे शक्य झाले, तर ते विज्ञानामुळे.

मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या या विज्ञानावर काही वेळा टीका केली जाते. विज्ञान शाप आहे, असे म्हटले जाते. कारण काही माणसांनी या विज्ञानाचा उपयोग विनाशकारी शस्त्रास्त्रे बनविण्यासाठी केला आहे. एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी या विज्ञानाचा शस्त्र म्हणून वापर केला आहे. पण त्यामुळे विज्ञानाचे महत्त्व कमी होत नाही.

आपल्या दैनंदिन जीवनात एकही घटक असा नाही की, ज्याला विज्ञानाने स्पर्श केलेला नाही. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आपण विज्ञानाच्या साहाय्याने जगत असतो. सकाळी उठल्या-उठल्या गिझरचे गरम पाणी, चहा बरोबर वर्तमानपत्र किंवा दूरदर्शनवरच्या बातम्या, प्रवासासाठी बस, ट्रेन, कार्यालयात संगणक, अंधार पडल्यावर वीज, झोपताना पंखा किंवा वातानूकुलित यंत्र आपल्याला साध्य झाली आहेत. म्हणूनच मानवी जीवन व विज्ञान या दोन्ही गोष्टी इतक्या एकरूप झाल्या आहेत की, जणू दुधात साखर. विज्ञानाशिवाय जीवन केवळ अशक्य आहे. अशा या विज्ञानाच्या साहाय्याने मनुष्य नक्कीच उद्या मंगळावर राहू लागेल.

अशा या विज्ञानरूपी जादूगाराला समस्त मानव जातीचा नमस्कार. विज्ञान म्हणजे परमेश्वराने मानवाला दिलेली जादूची कांडी व त्या कांडीच्या साहाय्याने सर्व प्राणिमात्रांत बुद्धिमान असलेल्या मानवाने स्वत:ची प्रगती केली.

''विज्ञानाने गती दिली मानवी जीवनाला,<br>
शोध अनेक लावुनी, दिले नवचैतन्य सृष्टीला''

२. **परीक्षा रद्द झाल्या तर ....** ४

परीक्षा.. परीक्षा.. परीक्षा.. फक्त अभ्यासच कर,<br>
सगळ्यांच्या आईबाबांचा एकच गजर

कंटाळा आला या परीक्षांचा ! असे वाक्य नेहमीच लहान मुलांपासून मोठ्या मुलांपर्यंतच्या किंबहुना सगळ्यांच्याच तोंडावर ऐकायला मिळते. आज लहान मुलांच्या जीवनातील आनंद ओरबाडून घेणारी जर कोणती बाब असेल तर ती म्हणजे 'परीक्षा' होय ! एखाद्या नावाजलेल्या शाळेत प्रवेश मिळविण्यासाठी २१/२ - ३ वर्षांच्या बाळालाही परीक्षेला तोंड द्यावे लागते. खरे पाहता ही लहान मुले या परीक्षेने हैराण झाली आहेत.

खरे पाहिले तर परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांचे अभ्यासात होणारे मूल्यमापन असते. शाळांतील, महाविद्यालयातील मुले परीक्षांत उत्तम गुण मिळविण्यासाठी धडपडत असतात. विशेषतः दहावीची बोर्डाची परीक्षा आली तर त्यांच्या तोंडचे पाणीच पळते. कारण परीक्षा ही मुलांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी 'परमदैवत' बनली आहे. अजूनपर्यंत पालकांनी कामावरील सुट्ट्यांची कारणे फिरायला जाणे, आजारी असणे ही असायची. पण आजकाल मुलाची परीक्षा आहे म्हणून महिनाभर सुट्टी घेणारे पालकही आपल्याला वारंवार दिसतात. परीक्षेला अवास्तव महत्त्व देण्यात येत आहे. म्हणून मुलांना न राहून वाटते की परीक्षा रद्द झाल्या तर .....

हा विचार मनात येताच खूप बरे वाटते. आनंदाने नाचावेसे वाटते पण दुसऱ्याच क्षणी भानावर आल्यावर कळते की, जर परीक्षा नसतील तर किती गोंधळ, अडचण निर्माण होईल ?

माणसाला आपल्या आयुष्यात क्षणाक्षणाला परीक्षा द्यावी लागते मग ती नसून कसे बरे चालेल. परीक्षा नसतील तर रिझल्ट कसा मिळणार. शिक्षक विद्यार्थ्यांला पहिल्या वर्गातून दुसऱ्या वर्गात कसे व कोणत्या आधारावर टाकणार. परीक्षा नाही म्हणजे विद्यार्थी अभ्यास करणार नाहीत. मग अभ्यास न करता होणारे डॉक्टर, शिक्षक, वकील कशाप्रकारे वागतील. डॉक्टर तर चुकीचे औषध देऊन मारूनच टाकेल, इंजिनिअर इमारतीचे योग्य काम करणार नाही, शिक्षक चुकीचे शिकवतील. नको रे बाबा ! हा विचार करूनच भीती वाटते. त्यापेक्षा थोडा अभ्यास करून परीक्षा दिलेलीच बरी. परीक्षा असणे हे अत्यंत आवश्यक आहे कारण त्याशिवाय विद्यार्थ्यांची प्रगती कळणार नाही. चांगले गुण मिळाल्यावर वर्गात कौतुक होणार नाही. बक्षिसे, पारितोषिके मिळणार नाहीत. म्हणून मला असे वाटते की परीक्षा असायला हव्यात, त्या रद्द होऊन चालणार नाही.

'परीक्षेने होते ज्ञानाचे मूल्यांकन
शिक्षणाचा ध्यास घ्या हेच खरे धन'

३. **किल्ल्याचे आत्मवृत्त** ४

काय ओळखलंत का ? तसा तुम्ही मला ओळखण्याचा प्रश्नच कुठे येतो म्हणा ! अहो, बंद दाराच्या पिंजऱ्यात राहणारे तुम्ही, तुम्हांला कसं कळणार आमचं मर्दानी आयुष्य, गनिमी कावे, मावळ्यांचे शौर्य, महाराजांचे स्वप्न आणि माझे राजवैभव ! आता ही माझ्या कानात 'हर हर महादेवाची' गर्जना घुमू लागते आणि नसानसातून माझं लढवय्या रक्त वाहू लागतं.

'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा'

असं वर्णन ज्या महाराष्ट्र देशाचं केलं जातं, त्या देशात जन्म घेणं यापेक्षा अधिक भाग्य दुसरे ते काय ! काळाचा पडदा एकामागे एक उलगडत जातो आणि माझाच चित्रपट मी स्वतःच्या नजरेने पाहू लागतो कारण मी साक्ष असतो त्या गौरवशाली इतिहासाची ! रायरीचा रायगड आणि कोंढाण्याचा सिंहगड होणं इतकं सोप नव्हतं. आजही तुमचे कवी वसंत बापट बोलून जातात,

'भव्य हिमालय तुमचा अमुचा, माझा केवळ सह्यकडा,
गौरीशंकर उभ्या जगाचा, मनात पुजीन रायगडा।'

सह्याद्रीच्या उभ्या-आडव्या पसरलेल्या रांगा आणि त्यात महाराष्ट्रात वाढत चाललेला अत्याचार. खरं तर कृष्णदेवरायाच्या मृत्यूनंतर महाराष्ट्राला तसा कोणी वालीच उरला नव्हता पण शिवनेरीवर शिवबाचा जन्म

झाला आणि मी पुन्हा एकदा पावन झालो. अगदी लहान वयात शिवाजीने तोरणा सर केला आणि हिंदवी स्वराज्याचे तोरण बांधले गेले. हिंदवी स्वराज्याची नव्याने पहाट झाली. 'शिवरायांचे आठवावे रूप, शिवरायांचा आठवावा प्रताप' असे रामदास स्वामी म्हणत ते काही खोटे नाही. शिवरायांच्या पराक्रमाने मी कृतार्थ झालो. महाराजांच्या दूरदृष्टीतून आम्हांला वैभव प्राप्त झाले. संगमरवरी जागतिक आश्चर्य बनवण्यापेक्षा आम्हांला काळाची गरज म्हणून महाराजांनी महत्त्व प्राप्त करून दिले.

महाराजांच्या शब्दासाठी जिवाची बाजी लावणारे बाजीप्रभू देशपांडे, मुलाच्या लग्नापेक्षा कर्तव्याला आधी झुकतं माप देणारा तानाजी, नेताजी पालकर, हंबीरराव मोहिते, संताजी-धनाजी, कान्होजी आंग्रे, मुलाच्या ओढीने किल्ल्याचा बुरूजदेखील उतरून जाणारी हिरकणीसारखी आई हे सर्व हिरे-मोती माझ्याच अंगाखांद्यावर तर खेळले.

आज देखील महाराष्ट्राचा गौरवशाली वारसा म्हणून तरूण पिढी आमच्याकडे पाहते तेव्हा मी धन्य धन्य होतो. मग स्वत:शीच गुणगुणू लागतो,

'बहु असोत सुंदर, संपन्न की महा
प्रिय अमुचा एक, महाराष्ट्र देश हा'

एखादा गिर्यारोहक आपला पराक्रम दाखविण्यासाठी माझ्यावर सरसर स्वार होतो आणि मला माझ्या मावळ्या मुलाची आठवण देऊन जातो. इतिहासप्रेमी मंडळी मला गतवैभव प्राप्त करून द्यायला जीवाचं रान करतात तेव्हा माझ्या दगडांतून देखील अभिमानाचे आनंदाश्रू वाहू लागतात. लहान मुलांना इतिहासासारख्या विषयातून आमची ओळख होते आणि आम्ही आमचे उज्ज्वल भविष्य डोळ्यांनी पाहू लागतो.

कधीतरी वाईट ही वाटतं, एखादा प्रियकर आपल्या प्रेमिकेचे नाव दगडावर कोरून जातो तेव्हा ओरडून सांगावसं वाटतं, मी पोकळ प्रेमाची नाही तर जाज्वल्य शौर्याची निशाणी आहे. माझे ढासळणारे बुरूज पाहिले की सांगावसं वाटतं, फक्त जयंत्या आणि पुण्यतिथ्या साजऱ्या करू नका, महाराजांचा वारसा खऱ्या अर्थाने पुढे चालविण्याचा प्रयत्न करा.

काळ बदलतो तशी परिस्थिती देखील बदलते. नव्या शतकानुसार कदाचित आम्ही कालबाह्य ठरत असू. पण आम्हाला नष्ट करू नका. अहो! इजिप्त, रोम, इटलीसारखे देश ऐतिहासिक वारशांवरच तर स्वत:चे वैभव वाढवू शकले. आमचीदेखील तशीच काळजी घ्या आणि परदेशी पर्यटकांना आकर्षित करा. शेवटी काय?

'स्वराज्य तोरण चढे, वाजती तोफांचे चौघडे
मराठी पाऊल पडते पुढे'

बरोबर ना!

**A.4. दिलेले मुद्दे वाचून त्यावर कथालेखन करा** 5

**<u>जिद्दी रामा</u>**

सुंदरपूर गावात रामा नावाचा एक हुशार मुलगा राहत होता. तो स्वाभिमानी होता, पण मनानेही तितकाच हळवा होता.

रामा दहावीत असतानाची गोष्ट. त्याच्या यशाबद्दल सर्वांना विश्वास होता व खात्री होती की, तो शाळेचा नावलौकीक सर्वदूर पसरवेल. पण कधी कधी दुर्दैव नेमके दत्त म्हणून समोर उभे राहते. ऐन सहामाही परीक्षेच्या वेळी रामा 'डेंग्यू' तापाने आजारी पडला. परीक्षा त्याने दिली; पण त्यातील यशाबद्दल त्यालाही खात्री नव्हती.

सहामाही परीक्षेचा निकाल लागला व तो सगळ्या विषयात नापास झाला. नेहमी प्रशंसा करणाऱ्या वर्गशिक्षकांनी यावेळी मात्र त्याचा चांगलाच पाणउतारा केला. वर्गातले सर्व विद्यार्थीही फिदीफीदी हसू लागले. त्याच्या मनात ही अपमानाची डागणी सलत होती. त्याने जिद्दीने अभ्यास करून यश मिळविण्याचे ठरविले.

आता तो अधिक जोमाने अभ्यास करू लागला. मार्च महिना उजाडला. परीक्षा सुरू झाली. रामा विश्वासाने उत्तरपत्रिका सोडवत होता. परीक्षा संपली. सर्व विद्यार्थी मौजमस्तीत गुंग झाले. पण रामा आतुरतेने निकालाची वाट पाहत होता. लवकरच वर्तमानपत्रात निकालाची तारीख जाहीर झाली.

निकालाच्या दोन दिवस अगोदरच रामाला बोर्डाकडून तार आली व तो बोर्डात प्रथम आल्याचे कळले व आनंदाने तो बेभान होऊन नाचू लागला. त्याच्या या यशाचे शाळेकडून कौतुक झाले व त्याचा गौरवसत्कार करण्यात आले.

**तात्पर्य :-** जिद्दीने केलेल्या कामात यश मिळतेच.

**किंवा**

## ग्लोबल वॉर्मिंग

5

(वर्गात पिंपळे गुरुजी भूगोल शिकवत असतात.)

**गुरुजी** : मुलांनो, तर अशाप्रकारे हा धडा संपला आहे. कोणाला काही प्रश्न असतील तर विचारा.

**रुपाली** : गुरुजी, काल ना माझे वडील टि.व्ही.वर 'ग्लोबल वॉर्मिंग' या विषयावरील माहितीपट पाहत होते. पण हे ग्लोबल वॉर्मिंग नक्की कशामुळे होते ?

**गुरुजी** : आज पृथ्वीवरील जागतिक तापमानात खूप वाढ झाली आहे. त्यालाच आपण 'ग्लोबल वॉर्मिंग' म्हणतो. पूर्वी ही तापमानवाढ पूर्णतः नैसर्गिक कारणांमुळे होत होती. मात्र सध्याचे तापमानवाढ ही पूर्णतः मानवनिर्मित असून त्याचे वाईट परिणाम सर्व सजिवांना भोगावे लागत आहेत.

**पुष्पा** : पण सर ग्लोबल वॉर्मिंग हे मानवामुळे कसे काय होऊ शकेल ?

**गुरुजी** : मानव प्रगती करत गेला. औद्योगिक क्रांती झाली त्यामुळे प्रदूषण वाढले. त्याचबरोबर हरितवायूचे मोठ्या प्रमाणावरील उत्सर्जन जागतिक ापमानवाढीला कारणीभूत ठरले आहे.

**रुपाली** : सर, ग्लोबल वॉर्मिंगमुळे नक्की परिणाम काय होतो ?

**गुरुजी** : समुद्राच्या पाण्याची पातळी वाढत चालली आहे. त्यामुळे भविष्यात अनेक महत्वाच्या शहरांना धोका संभवतो. ह्यावर एकमेव उपाय म्हणजे हरितवायूचे उत्सर्जन आटोक्यात आणणे. त्यासाठीऔद्योगिक प्रकल्पांना आळा घालणे महत्त्वाचे आहे. परंतु त्यामुळे आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागण्याची भीती प्रत्येक राष्ट्राला वाटते.

**रमण** : मग हे 'ग्लोबल वॉर्मिंग' थांबवण्यासाठी काय करता येईल ?

**पुष्पा** : त्यासाठी आपण वृक्षतोड थांबवून भरपूर झाडे लावून ती जगवली तर हे 'ग्लोबल वॉर्मिंग' कमी होऊ शकेल.

**गुरुजी** : हो हो नक्कीच. त्याचा फायदा आपणा सर्वांनाच होईल.

**सारेजण** : झाडे लावूया, वसुंधरेला वाचवूया.

| | | |
|---|---|---|
| | **खंड 'ग'** | |
| **A.5.** | **अ) खालील प्रश्नांची उत्तरे कंसातील सूचनेप्रमाणे सोडवा.** | |
| १. | झटपट - **क्रियाविशेषण अव्यय** | **1** |
| २. | देखील - **शब्दयोगी अव्यय** | **1** |
| ३. | पण - **उभयान्वयी अव्यय** | **1** |
| ४. | येथे अशुभाची सावली पडणार नाही. | **1** |
| ५. | किती कौतुक केले स्वामीजींनी कोच्चूचे! | **1** |
| **A.5.** | **आ) प्रयोग ओळखा.** | |
| १. | मास्तर अनेकांची पुस्तके प्रकाशीत करतात. | **1** |
| २. | सणगर समाजाने घोंगड्या विकल्या. | **1** |
| ३. | राजूने फुलपाखरास पकडले. | **1** |
| **A.5.** | **इ) काळ ओळखा.** | |
| १. | भूतकाळ | **1** |
| २. | वर्तमानकाळ | **1** |
| **A.5.** | **ई) लिंग बदला.** | |
| | १. पाहुणा - पाहुणी     २. सेवक - सेविका | **1** |
| | ३. युवक - युवती     ४. चिमणा - चिमणी | **1** |
| **A.5.** | **उ) वचन बदला.** | |
| | १. झोपडी - झोपड्या     २. जात - जाती | **1** |
| | ३. कविता - कविता     ४. नकाशा - नकाशे | **1** |
| **A.5.** | **ऊ) समानार्थी शब्द लिहा.** | |
| | १. भीती - भय     २. पृथ्वी - वसुधा, धरती, अवनी | **1** |
| **A.5.** | **ए) विरूद्धार्थी शब्द लिहा.** | |
| | १. पवित्र × अपवित्र     २. धर्म × अधर्म | **1** |
| **A.5.** | **ऐ) पुढील वाक्यात कंसातील योग्य वाक्प्रचार वापरुन वाक्य पुन्हा लिहा.** | |
| १. | मुले विनाकारण मुक्या प्राण्यांना **हैराण करतात.** | **1** |
| २. | शहरांत सध्या सिमेंटच्या जंगलांनी **कहर केला आहे.** | **1** |

| | | |
|---|---|---|
| | **खंड 'घ'** | |
| **A.6.** | **अ) खालील वाक्यांचे संदर्भ देऊन स्पष्टीकरण करा : (कोणतेही एक)** | |
| १. | **संदर्भ :** वरील वाक्य 'उरूसाचे दिवस' या पाठातून घेतले आहे. या पाठाच्या लेखिका 'आशा आपराद' आहेत. पन्हाळगडावरील उरूसाच्या आठवणी सांगताना त्यातील उत्साह व आनंदाचे वर्णन करताना केलेले हे विधान आहे.<br>**स्पष्टीकरण :** लेखिकेच्या घरी दोन ईद मोठ्या उत्साहात साजऱ्या केल्या जात. यावेळी गल्लीतील सगळे लोक, मैत्रिणी घरी जेवायला येत. पन्हाळ्याचा उरूसही असाच आनंदात साजरा होई. पन्हाळ्याचा दरगाह आणि तेथे होणारा उरूस म्हणजे हिंदू-मुस्लीम लोकांच्या एकतेचे प्रतीक असलेले पवित्र स्थान आहे. या दरगाहला मुस्लिमांच्या इतकेच किंबहुना जास्तच हिंदू भक्त आहेत. सर्व जातिधर्मांचे लोक तेथे सजून-धजून स्त्रिया, मुलांबाळांसह दर्शनाला येत असत. तेथे मुस्लीमांच्या मन्नतबरोबर हिंदूंचे नवसही बोलले जात. असे सगळे सण, उत्सव, ईद आणि उरूस साजरे होताना हा हिंदूंचा सण व मुसलमानांची ईद असा दुजाभाव कधीच होत नसे. उत्सवाचा निखळ आनंद घेताना अशा भेदभावाच्या भिंतींनी कधीच अडसर केला नाही.<br>**वैशिष्ट्य :** सर्वधर्मसमभावाची भावना येथे दिसून येते. | 4 |
| २. | **संदर्भ :** वरील वाक्य 'बाबूजी' या पाठातील आहे. त्याचे लेखक 'संजीव गिरासे' आहेत. लेखकांच्या संवेदनशील मनाच्या अस्वस्थतेचे दर्शन घडवताना वरील विधान केले आहे.<br>**स्पष्टीकरण :** सर्व सुख-सुविधांनी युक्त असलेला केशवचा बंगला पाहून लेखकाला आनंद झाला. आपला मित्र केशव अतिशय कंजूष आहे, हे लेखकाला माहीत होते. तरीही त्याने आपल्याला घरी बोलावल्याचे समजताच लेखकाला आश्चर्य वाटले. त्याच्या प्रत्येक शब्दातून बंगल्याची श्रीमंती दिसत होती. परंतु केशवला ज्या वडिलांनी लहानाचे मोठे केले, वेळप्रसंगी उपाशी राहून केशवला इंजिनीअर बनवले; त्या वडिलांची साधी आठवणही बंगल्यात नव्हती. एवढ्या मोठ्या ऐश्वर्य संपन्न घरात केशवचे वडील म्हणजे बाबूजी नव्हते. त्यांच्या शोधात लेखकाची नजर बंगल्यात फिरत होती. त्याप्रसंगी स्वतःच्या मनातील विचार व्यक्त करताना लेखकाने वरील विधान केले आहे.<br>**वैशिष्ट्य :** केशवच्या वडिलांच्या दर्शनासाठी आसुसलेल्या लेखकाच्या संवेदनशील मनाचे दर्शन घडते. | 4 |
| ३. | **संदर्भ :** वरील वाक्य 'काय राव पुस्तकराव' या पाठातून घेतले आहे. या पाठाचे लेखक 'दासू वैद्य' आहेत. जीवनातील पुस्तकांचे महत्त्व सांगताना हे विधान केले आहे.<br>**स्पष्टीकरण :** मंदार आणि मानसी अभ्यास करताना पुस्तकांची योग्य काळजी घेत नव्हते. मंदारने अभ्यास झाल्यावर पुस्तक टाकून दिले आणि तो झोपला. मानसीसुद्धा पुस्तक वाचता वाचता झोपली तेव्हा तिच्या अंगाखाली पुस्तक पार चुरगळून गेले होते. अशावेळी पुस्तकराव त्यांना समजावून सांगतात की, पुस्तकांचा उपयोग व्यवस्थित केला पाहिजे. त्यांची नीट काळजी घेतली पाहिजे. कारण पुस्तकांचा उपयोग जे व्यवस्थित करतात, तेच मोठे होतात. ज्ञानी होतात, विद्वान होतात. शिवाय पुस्तकांशी मैत्री करणारे कधीच गरीब राहत नाहीत. मार्क्स, लेनिन, टॉलस्टॉय, शेक्सपीअर, कालिदास, महात्मा गांधीजी, लोकमान्य टिळक, | 4 |

| | | |
|---|---|---|
| | पंडित नेहरू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, रवींद्रनाथ टागोर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले अशा मोठ्या लोकांनी पुस्तकांचा योग्य व व्यवस्थित उपयोग केला म्हणून ते खूप मोठे झाले आहेत.<br>**वैशिष्ट्य :** ज्ञानी होण्याचा योग्य मार्ग पुस्तकरावांनी येथे दाखवला आहे. | |
| **A.6.** | **आ) योग्य पर्याय शोधून विधान पूर्ण करा.** | **1** |
| १. | बाबांचं घराणं **मालगुजाराचं .** | |
| **A.7.** | **अ) खालील प्रश्नांची उत्तरे सुमारे ५०-६० शब्दांत लिहा. (कोणतेही दोन)** | |
| १. | नागिणीच्या मुलांनी मुग्यांना वारूळ बनवताना मातीमध्ये सिमेंट मिसळा, घर वॉटरप्रूफ करून घ्या, असे काही बदल सुचवले. त्यावेळी नागिणीला आपली मुलं माणसांच्या वळणावर जातात की काय अशी भीती वाटली. त्यावेळी मुलांना थांबवत ती म्हणाली की, नाग जेव्हा अन्न मिळवायला बाहेर फिरतात तेव्हा माणसे त्यांना दगड मारून त्रास देतात. नागांनी उंदीर खाल्ले तर माणसाचाच फायदा होणार असतो पण हे त्यांना कळत नाही. जमीन भुसभुशीत करणारी वारुळे शेतात तयार केली की माणूस ती नांगरून, तोडून टाकतो. शिवाय माणसांनी सर्वत्र सिमेंट आणि डांबरी रस्ते बनवलेले आहेत. ज्यामुळे सूर्यकिरण जमिनीपर्यंत पोहोचतच नाहीत. त्यामुळे प्राण्यांनी जगायचं कसं हा प्रश्न निर्माण झाला आहे. खरे तर सारे जीव एकमेकांवर अवलंबून असतात आणि त्यामुळेच ही सृष्टी चालते. परंतु मनुष्य अविचाराने वागून स्वत:ही मरेल आणि इतर उपयोगी प्राण्यांनाही मारेल. नागिणीचे निसर्गाचा समतोल साधण्यासाठीचे विचार मुंग्या शांतपणे ऐकत होत्या.<br>वरील प्रसंगातूनच नागिणीचे शहाणपण दिसून येते. | **4** |
| २. | एक दिवस रस्त्याच्या कडेला असह्य वेदनांनी कण्हत असलेला, नासलेल्या शरीराचा तुळशीराम बाबांना दिसला. त्याची ती दुरावस्था बघून त्यांना खूप दु:ख झाले. त्यावेळेपासूनच बाबांनी घरची श्रीमंती आणि सर्व सुखांचा त्याग करून आपले जीवन कुष्ठरोग्यांसाठी समर्पित केले. एका गरीब कुष्ठरोग्याला घरी आणून त्यांनी सर्व नातेवाईकांचा विरोध ओढावून घेतला. परंतु, याचवेळी सोबत म्हणून साधनाताईंच्या रूपात एक जीवाभावाचा माणूसही मिळाला. कष्टाशिवाय जीवन नाही, त्यागाशिवाय सुख नाही असे मानणाऱ्या साधनाताईंनी बाबांना संपूर्ण साथ दिली. परंतु दुर्दैवाने याचवेळी वेळेवर योग्य ते उपचार न झाल्याने, महारोग झालेल्या तुळशीरामाचा मृत्यू झाला. त्यावेळी दु:खी झालेल्या बाबांनी ताईंजवळ आपल्या अस्वस्थतेची, दु:खाची कबुली दिली. या दु:खाची तीव्रता कशी कमी करता येईल, वेदनेचे आनंदात कसे रूपांतर होईल हा ध्यास यावेळी या पतीपत्नीला लागला. या ध्यासातूनच आनंदवनाची निर्मिती झाली.<br>अशाप्रकारे कुष्ठरोग्यांच्या दु:खाच्या सहानुभूतीतून आनंदवन निर्माण झाले. | **4** |
| ३. | पहाटे सारा आसमंत नवलाईने फुलून आलेला होता. वाऱ्याच्या जोरदार झटकाऱ्यांनी झाडे आनंदविभोर झालेली वाटत होती. पावसाचीएखादी सर झरझरून ओसरुन गेली असल्यामुळे आभाळ अगदी स्वच्छ, निळेशार दिसत होते. पूर्ण चंद्र साऱ्या वैभवात नटलेला होता. घननिळ्या आभाळातले चांदणे मनाला भूल घालत होते. पहाटेच्या नि:स्तब्ध शांततेमध्ये कोकिळेचा कुहूऽकुऽहू आवाज मनाला धुंद करत होता. हे सारे | **4** |

| | | |
|---|---|---|
| | क्षण जपून ठेवावे, असे लेखकाला वाटत होते. कारण ऋतुचक्रांचे विभ्रम पुन्हा पुन्हा बघायला मिळतात. परंतु हा ऋतू, हा दिवस, हे क्षण पुन्हा पुन्हा येणार नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे निसर्गाला जुनं सोसवत नाही. त्याला नित्य नव्याचा सोस असतो म्हणूनच तर सगळी झाडे दरवर्षी बहरतात.<br>अशाप्रकारे वरील अनुभवामुळेच निसर्गाला नित्य नव्याचा सोस असतो, असे म्हटले आहे. | |
| ४. | पुस्तकरावांनी प्रकट होण्याआधी मंदार व मानसी यांना डोळे झाकण्यास सांगितले. रंगमंचावर अंधार झाला. प्रकाशाची उघडझाप झाली व त्यांच्या प्रवेशाला पूरक असे संगीत वाजवले गेले. मग काही क्षणातच पुस्तकराव वेगळ्या पोशाखात रंगमंचावर आले.<br>रंगमंचावर आलेल्या पुस्तकरावाने पांढरे सैल कपडे घातले होते. या कपड्यांवर पुस्तकाच्या पानांप्रमाणे गणित, कविता, नकाशे, चित्र इत्यादी गोष्टी होत्या. डोक्यावर गमतीदार टोपी होती. एका पायाला प्लॅस्टरप्रमाणे कपडा गुंडाळलेला होता. डोळ्यांना गोल चष्मा होता.<br>अशाप्रकारे रंगमंचावर आलेल्या पुस्तकरावांच्या पोशाखाचे लेखकाने वर्णन केले आहे. | 4 |
| **A.7.** | **आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** | |
| १. | केशवचा स्वभाव जरा म्हणजे जास्तीचा कंजूष आहे. | 1 |
| २. | पन्हाळ्याचा दरगाह म्हणजे हिंदू-मुस्लीम लोकांच्या एकतेचे प्रयत्न केलेल्या वलींचे (संत पुरुषाचे) पवित्र स्थान आहे. | 1 |
| **A.8.** | **अ) खालील पद्यपंक्तींचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा : (कोणतेही एक)** | |
| १. | **संदर्भ :** वरील ओळी 'आपण धरणी गं' या कवितेतून घेतल्या आहेत. त्याचे कवी 'ऋषीकेश कांबळे' आहेत. या कवितेत कवीने अन्याय, अत्याचाराच्या विरोधात लढण्यासाठी सज्ज झालेल्या स्त्रीचे वर्णन केले आहे.<br>स्पष्टीकरण : कवितेतील स्त्री म्हणते आपण व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात सतत दु:ख, हालअपेष्टा, अपमान, उपेक्षा सोसत असतो. पण हे सगळे सोसूनही कितीही दु:ख असले तरी आपल्याला ते विसरून सतत साऱ्या जगाला म्हणजेच आपल्या कुटुंबाला पोसावं लागतं. आपल्या मनाची माती करून म्हणजेच सारा मान-अपमान विसरून सगळी नातीगोती जपावी लागतात.<br>**वैशिष्ट्य :** स्त्री दु:खाचे चित्रण येथे नेमक्या शब्दांत केले आहे. | 4 |
| २. | **संदर्भ :** वरील ओळी 'गाव' या कवितेतून घेण्यात आल्या आहेत. त्याचे कवी 'अनिल पाटील' आहेत. येथे गावाबद्दलची ओढ व्यक्त झाली आहे.<br>**स्पष्टीकरण :** गावातील निसर्गसौंदर्याचे वर्णन कवी अगदी भावूकपणे करतो. त्याच्या गावी वेडीवाकडी वळणे घेत घेत वाहणाऱ्या नदीत खळखळणारे पाणी आहे. नदीचे सौंदर्य पाहताना कवीची नजर पाखरासारखी | 4 |

| | | |
|---|---|---|
| | सर्वत्र भिरभिरते. नदीच्या तसेच गावाच्या सौंदर्याचे वर्णन करताना त्याला शब्दच सापडत नाहीत म्हणून त्याची वाणी अबोल होते. जणू निसर्गाच्या सौंदर्यात, त्या धुंद वातावरणात कवीचे मन शांत शांत होत जाते.<br>**वैशिष्ट्य :** निसर्गसौंदर्याचा मानवी मनावर होणारा सुखद परिणाम येथे दिसून येतो. | |
| ३. | **संदर्भ :** वरील ओळी 'एकत्वाचे गीत महान' या कवितेतून घेण्यात आल्या आहेत. त्याच्या कवयित्री 'आश्लेषा महाजन' आहेत. येथे आपल्या देशात विविधतेत एकता व समता कशी नांदते याचे सुंदर वर्णन केले आहे.<br>**स्पष्टीकरण :** देशाच्या महानतेचे वर्णन करताना कवयित्री म्हणते की, येथील नभामध्ये तिरंगा ध्वज नेहमीच उंचच उंच फडकत आहे. येथील लोकांच्या मनात आजही गंगेचे पावित्र्य जपलेले आहे. येथे हिमनगाच्या उंचच उंच रांगादेखील आहेत. येथील चंद्र, सूर्य आणि मातीही आपणास समतेची शिकवण देतात. असा हा चंद्र, सूर्य आणि माती आम्हांला वंदनीय आहेत.<br>**वैशिष्ट्य :** भारतभूविषयी आदराची भावना येथे व्यक्त होते. | 4 |
| **A.8.** | **आ) खाली दिलेल्या पद्यपंक्तीतील रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द वापरून ती पद्यपंक्ती पुन्हा लिहा :** | |
| १. | गिळून <u>**दुःख**</u> सारं साऱ्या जगा पोसावं. | 1 |
| **A.9.** | अ) **खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा : (कोणतेही दोन)** | |
| १. | पोटापाण्यासाठी दूर शहरात गेलेल्या कवीला गावाची खूप आठवण येते. या आठवणीत त्याला बाभळीच्या बनाशेजारी असलेल्या आमराईची आठवण येते. ज्या आमराईमध्ये त्याला शांत, स्वस्थ वाटायचे. त्या आमराईच्या गर्द, घनदाट सावलीमध्ये छान झोप लागायची. त्यावेळी वारा जणू अंगाई गात वाहतो आहे, असे वाटायचे. कवीला वेडीवाकडी वळणे घेत वाहणाऱ्या नदीतील खळाळतं पाणीसुद्धा पाहायला आवडायचे. गावातील सौंदर्य पाहताना कवीची नजर पाखरासारखी भिरभिरायची. या नजरेसमोर काळ्याभोर शेतातील हिरवेगार पीकही उभे राहायचे. त्या शेतात कवीचे मन रेंगाळायचे. गावाच्या या निसर्गसौंदर्याने कवीचे तन, मन अगदी धुंद होत असायचे.<br>अशाप्रकारे वरील कारणांमुळेच कवीला गावातील आमराई, नदी, शेत आवडते. | 4 |
| २. | कवयित्रीने देशातील विविधतेतील एकतेचे वर्णन केले आहे. ज्याप्रमाणे इंद्रधनुष्यात जरी विविध रंग असले तरी त्याची कमान मात्र एकच असते. त्याचप्रमाणे भारतातही आपल्याला विविधतेतील एकता दिसून येते. आपल्या देशात वेगवेगळे प्रांत आहेत. या प्रांतातील लोकांची रूपे, त्यांची भाषा, पूजाअर्चा आणि वेशभूषा यामध्ये विविधता आहे. तरीही येथील लोकांच्या हृदयात वाहणारा प्राणवायू एकच आहे. हा प्राणवायूसुद्धा आपणास समतेची, एकतेची शिकवण देत आहे. नेहमी उंचच उंच फडकणारा तिरंगा ध्वज, लोकांच्या मनातील गंगेचे पावित्र्य आणि हिमनगाच्या उंच रांगा आपणांस एकत्वाचा संदेश देतात. तसेच येथील चंद्र, सूर्य आणि मातीसुद्धा आपल्याला समानता शिकवतात.<br>अशाप्रकारे एकत्वाचे अनेक विचार कवितेतून व्यक्त झाले आहेत. | 4 |

| | | |
|---|---|---|
| ३. | कवीच्या मते स्त्रीने हक्क मिळवताना अन्यायाच्या विरोधात लढण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. अन्यायाला चिरडून, वाघवाघिणीसारखे शूर बनून तिने आपले हक्क मिळवावे. या स्त्रीने यशोधरा, जिजाऊ, सावित्रीबाई, रमाबाई अशा महान स्त्रियांची, त्यांच्या कर्तृत्वाची ओळख करून घ्यावी आणि आपणही त्याच मार्गाने चालावे. समता प्रस्थापित करण्यासाठी चंदनाप्रमाणे झिजावे. त्याचबरोबर रक्ताचे पाणी करून आपले हक्क मिळवावेत. अवसान असताना दुःख न करता कणखरपणे अन्यायाविरूद्ध ललकारी देऊन पुढे यावे. अन्यायाचा अंधार दूर करण्यासाठी हेवा न करता दिवा जसा जळतो तसे तिनेही तेजाने तळपावे आणि उजेडाची गाणी गावीत.<br>अशाप्रकारे आपले हक्क मिळवण्यासाठी स्त्रीने जागृत होऊन लढले पाहिजे, असे कवीला वाटते | 4 |
| ४. | देशातील विविधतेतील एकतेचे वर्णन करताना कवयित्री इंद्रधनुष्याचे उदाहरण देते. जसे इंद्रधनुष्यात जरी विविध रंग असले तरी त्याची कमान एकच असते. तशीच भारतातही ही विविधतेतील एकता दिसून येते. आपल्या देशात वेगवेगळे प्रांत आहेत. या प्रांतातील लोकांची रूपे, त्यांची भाषा वेगळी आहे. परंपरा, पूजाअर्चा आणि परमेश्वर भक्तीचे त्यांचे मार्गही वेगवेगळे आहेत. त्याचबरोबर त्यांची वेशभूषा यामध्येही आपल्याला विविधता असल्याचे आढळून येते.<br>अशा विविध बाबींमुळे देशातील वेगळेपण दिसून येते. | 4 |
| **A.9.** | **आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| १. | कवीच्या डोळ्यांपुढे त्याच्या आठवणीतला गाव येतो. | 1 |
| २. | समता निर्माण होण्यासाठी रक्ताचे पाणी करावे असे कवितेतील स्त्रीला वाटते. | 1 |
| **A.10.** | **अ) खालील पठित उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : (कोणतेही एक)** | |
| १. | परोपकार हा महान गुण आहे. इतरांना मदत केल्याने आपल्याला एक समाधान मिळते. तो आनंद आपल्या जीवनात उत्साह भरतो. मी आमच्या शेजारच्या आजी-आजोबांना रोज वर्तमानपत्र वाचून दाखवतो. आईला घरकामात मदत करतो. लहान बहिणीला आणि मित्रांना अभ्यासात मदत करतो. रस्त्यावरील अंध व्यक्तीला आधार देऊन त्यांना मदत करतो. गरीब, अनाथ मुलांना माझा खाऊ देतो. अपंगांना आधार देतो, त्यांच्याशी खेळतो, त्यांना गाणे गाऊन दाखवतो. शाळेतील साफ-सफाईसाठीही हातभार लावतो. मला आमच्या बागेतल्या रोपट्यांना पाणी द्यायला खूप आवडते. | 4 |
| **A.10.** | **आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा : (कोणतेही एक)** | |
| १. | पंढरपूरातील चंद्रभागा नदीला पावित्र्याचा स्पर्श आहे. | 1 |
| २. | लेखक हायस्कूलमध्ये शिकत असताना शाहुपुरीतील अडत दुकानात उतरुन गुळाचा हिशेब घेऊन येण्यची जबाबदारी वडिलांनी त्यांच्यावर सोपवली होती. | 1 |

❖❖❖❖